Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१७/२०२६

**विषय -** अधिसभेच्या बैठकीच्या अनुषंगाने दि.२८ फेब्रुवारी, २०२६, दि.०१ मार्च, २०२६ व दि. ०३ मार्च, २०२६ रोजीच्या कार्यालयीन कामकाजातील बदलाबाबत

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाची अधिसभा दि.११ मार्च, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर अधिसभेच्या बैठकीसाठी अधिसभा सदस्यांकडून प्रश्न व ठराव स्विकारण्याची अंतिम तारिख दि.२८ फेब्रुवारी, २०२६ आहे. सदर प्रश्नांची उत्तरे संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्राप्त करुन घेऊन सदर उत्तरे अंतिम करणेसाठी दि.०२ मार्च, २०२६ रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही ही एकरुप परिनियमानुसार विहित वेळेत होणे आवश्यक आहे. याअनुषंगाने सदर कामकाजासाठी **चौथा शनिवार, दि.२८ फेब्रुवारी, २०२६ रोजीची कार्यालयीन सुट्टी रद्द करण्यात आली आहे. सदर दिवशी कार्यालयीन कामकाज नियमित वेळेनुसार सुरू राहील, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.** या दिवसांची पर्यायी सुट्टी यथावकाश जाहीर करण्यात येईल.

तसेच, दि.०१ मार्च, २०२६ रोजी रविवार असल्याने व दि. ०३ मार्च, २०२६ रोजी होळी (दुसरा दिवस) निमित्त कार्यालयास सुट्टी आहे. परंतु ज्या प्रशासकीय विभागाचे अधिसभेचे प्रश्न/ठराव असतील त्या प्रशासकीय विभागांनी आपले प्रशासकीय विभाग सदर दिवशी सुरु ठेवावेत. या दिवशी सुरु ठेवण्यात आलेल्या प्रशासकीय विभागातील संबंधितांनी पर्यायी सुट्टी विभाग प्रमुखांच्या पूर्व परवानगीने घेण्यात यावी.

सदरचे परिपत्रक विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालयांना लागू असणार नाही.

( डॉ. व्ही. एन. शिंदे )
**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/** 247

**दि.** 25 FEB 2026

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक,

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.